
# <u>जिल्हा पातळीवरील सात वाळू घाटांची सार्वजनिक सुनावणी, जिल्हा नाशिक महाराष्ट्र</u>

## <u>कार्यकारी सारांश</u>

### 1. प्रस्तावना

- नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, निफाड, कळवण, तालुक्यातील 5 वाळू घाटांची पर्यावरणीय अनुमती प्रस्तावित आहे.
- महाराष्ट्र सरकार पत्र क्र. संकिर्ण 2019/पी.के.01/त.के.3 दि. 3 डिसेंबर, 2019 नुसार 5 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी आयोजित केली आहे.
- पर्यावरणीय मंजुरीसाठी फॉर्म-1 एम, प्रि फिझीबीलिटी रिपोर्ट, पर्यावरण व्यवस्थापन योजना, रिस्क असेसमेंट, जिल्हा सर्वेक्षण अहवाल, मंजूर झालेला वाळू घाटांच्या खाणकाम अहवाल जनसुनावणी अहवालासहित जमा करावा.

### 2. स्थळ नकाशा.



# नाशिक जिल्ह्यातील जनसुनावणीसाठीचे जिल्हास्तरीय 7 वाळू घाट

## 3. वाळू घाटांची यादी

| अ. क्र. | तालुका | नदीचे नाव | गावाचे नाव/ वाळु गटाचे नाव | गट नं. | क्षेत्र (हेक्टर) | परिमाण (मीटरमध्ये) | | | | तांत्रिक समिति अहवाल | ग्रामसभा ठराव | तालुकास्तरीय समिती शिफारस | शासन निर्णयानुसार वाळूघाटाची हातची किम्मत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | लांबी | रुंदी | खोली | परिमाण (ब्रास) | | | | |
| 1 | कळवण | गिरणा | देसगांव | देसगांव. ग. नं. 53 ते 58 ति-हळ ग. नं. 127, 128,130,139, 140, 141, 145 | 1.04 | 520 | 20 | 0.3 | 1102 | योग्य | होकारार्थी | योग्य | 1852541.34 |
| 2 | कळवण | गिरणा | कळवण बु. | 103, 104, 115, 116, 119 | 1.02 | 300 | 34 | 0.3 | 1081 | योग्य | होकारार्थी | योग्य | 1816915.54 |
| 3 | कळवण | तांबडी | वरखेडा | 13, 23, 25, 26 | 1.008 | 560 | 18 | 0.3 | 1069 | योग्य | होकारार्थी | योग्य | 1795540.07 |
| 4 | निफाड | कादवा | जळगांव 2 | 426, 423, 1 ते 3, 5 ते 12 लगत | 3.6 | 600 | 60 | 1.0 | 12721 | योग्य | होकारार्थी | योग्य | 21375732.35 |
| 5 | मालेगांव | गिरणा | पाटणे | ग. नं. 360 ते 363 येगडी नाला लगत | 1.0065 | 183 | 55 | 1 | 3557 | योग्य | होकारार्थी | योग्य | 5976227.12 |
| **एकूण** | | | | | | | | | **19530** | | | | **32816956.43** |

**4. खाणकाम कार्यपद्धती**

1. खाणकाम पद्धती - ओपनकास्ट विना ड्रिलींग व स्फोट न करता हाताने केलेले कार्य, मनुष्यबळाचा, घमेली, कुदळ फावड्यासारख्या उपकरणांचा वापर केला जाईल. वाळूचे उत्खनन हे केवळ कोरड्या नदीपात्रातून केले जाईल. वाळू घाटातून वाळूचा अंदाज बांधण्यासाठी खालील कार्यपद्धती अवलंबली जाईल.

- 10.मी.X10.मी. अंतरावर सीमांकन आणि स्थिरचिन्हांकन
- प्रत्येक ग्रीड मधून वाळू संशोधनासाठी ऑगर ड्रीलर वापरला जाईल.
- वाळू घाटांमध्ये छिद्र करण्यासाठी 10.मी.X10.मी. ग्रीड पॅटर्न मध्ये ऑगर ड्रीलर वापरला जाईल.
- मोजपट्टीने छिद्रांची मोजणी केली जाईल.
- सर्व मोजणी झाल्यावर नदीच्या वाळू घाटांची सरासरी खोली मीटरमध्ये गणली जाईल.

2. उपकरणे/साधने :- कुदळ, घमेले, ट्रॅक्टर व ट्रॉली
3. दळणवळण:- ट्रॅक्टर ने भांडारगृह किंवा ग्राहकापर्यंत
4. पुनर्भरण:- उत्खनन झालेल्या भागाचे पुनर्भरण मान्सुननंतर आपोआप होईल, नदीकाठावर आणि दळणवळण रस्त्याच्या बाजूने केली जाईल.

**5. पर्यावरणीय व्यवस्थापन योजना :-**

1. हवा प्रदुषण व्यवस्थापन

- वाळू वाहतूकिच्या कच्चा रस्त्यावर पाण्याची फवारणी केली जाईल.
- वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व ट्रक ताडपत्रीने झाकले जातील.
- वाळू वाहतूक समयी होणाऱ्या वाळूचे गाळण हे योग्यप्रकारे रिकाम्या जागा सील करुन प्रतिबंधित केले जाईल.
- नदीकाठावर आणि वाळू घाटानजिकच्या मोकळ्या जागेवर वृक्ष लागवड केली जाईल.

2. ध्वनी प्रदुषण व्यवस्थापन:-

- खाणकाम आणि वाळू वाहतूक हि केवळ दिवसा केली जाईल.
- अपेक्षा आहे कि फक्त वाळू वाहतुकीमुळे आवाज होतो, खात्री देतो की वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांची देखभाल करुन आवाज कमी होईल.
- वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांचा वेग नियंत्रित राहील.

3. जल प्रदुषण व्यवस्थापन:-

- वाळू उत्खनन हे केवळ कोरड्या नदीपात्रातून केले जाईल.

- उत्खनन केवळ भुजल पातळीच्या वर केले जाईल.
- नदी प्रवाह निष्क्रिय पात्राकडे वळवला जाणार नाही.
- नदीपात्रात वाहनांची धुलाई करणे प्रतिबंधित राहील.
- उत्खनन कार्यातून कोणताही प्रवाही निर्माण होणार नाही
- कामगारांसाठी फिरते स्वच्छतागृह पुरवले जाईल.
- मान्सून व पुर या काळात उत्खनन बंद राहील ज्यामुळे वाळू घाटांचे पुनर्भरण होईल.

4. जमीन पर्यावरण:-

- वाळू उत्खननामुळे काही अंशी कोरड्या नदीपात्रात खड्डे तयार होतील, परंतू मान्सूनमधे त्यांचे पुनर्भरण होईल.
- उत्खनन करण्यापुर्वी नदी काठापासून सुरक्षित अंतर 3 मी. किंवा नदीपात्राच्या एकूण रुंदीच्या 1/10 प्रमाणात, जे जास्त असेल ते अंतर दोन्ही काठापासून सोडले जाईल.
- पॉलियीन पिशव्या, जूट पिशव्या, इ सारख्या टाकाऊ वस्तुंला नदीपात्रात टाकण्यास प्रतिबंध राहील.
- मंजूर क्षमतेपेक्षा जास्त उत्खनन होणार नाही
- नदीकाठांवर आणि नजीकच्या रिक्तस्थानी वृक्षांची लागवड केली जाईल.

5. हरितपट्टा व्यवस्थापन योजना:-

| | |
|---|---|
| हरितपट्टयाचे स्थान | लीझ सीमेच्या दोन्ही काठांवर आणि नदीपात्राबाहेरील रस्ता |
| लागवड करणा-या झाडाची संख्या | 500 वृक्ष प्रति हेक्टर |
| झाडांमधील अंतर | 2 मी. ग्रिड पद्धतीने |
| झाडांच्या प्रजाती | स्थानिक प्रजाती |

लागवडीसाठी शिफारस केलेल्या वृक्ष प्रजाती

| अ.क्र. | वनस्पतीचे नाव | स्थानिक नाव | महत्व |
|---|---|---|---|
| 1 | अझाडीराक्टा इंडिका | लिंब | लिंब तेल व लिंब उत्पादने |
| 2 | टेक्टोना ग्रांडीस | टिक | जैवप्रतिबंधक, प्रतिजैविक, अँटीफंगल |
| 3 | फायकस रिलिगीओसा | पिंपळ | औषधी वापर, फळ व अंजीर |
| 4 | बांबुसा वल्णेरीस | बांबू | कृमीनाशक औषध, दाहक विरोधी |
| 5 | माधुका लोंगीफोलिआ | महुआ | उत्तेजक, कफ नियंत्रक |

**6. व्यवसायिक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापन:-**

- खाण चालकाने वैयक्तिक प्रतिबंधात्मक साधने पुरवली पाहिजेत.
- संरक्षक शिरस्त्राण व पादत्राणे, तसेच कान, डोळे व हातासाठी प्रतिबंधात्मक उपकरणे.
- कामगारांना धुळीसाठी मास्क पुरवावे.
- कामगारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेत येईल.
- खाणकाम जागेवर प्रथमोपचार पेटी पुरवली जाईल.

**7. निष्कर्ष :-**

पर्यावरण व वन मंजुरी मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अन्वये अर्ज केलेल्या महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव, निफाड, कळवण तालुक्यातील 5 वाळू घाटांचे लीझ क्षेत्र 5 हेक्टरपेक्षा कमी असुन बी-2 प्रवर्गामध्ये येते.

- अल्प प्रमाणात केलेल्या उत्खननाचा पर्यावरणावर काही विशेष परिणाम होणार नाही आणि नजीकच्या समुदायाला फायदेशीर सिद्ध होईल.
- प्रस्तावित प्रकल्पामुळे अप्रत्यक्षरित्या स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.
- प्रस्ताविक प्रकल्प सामाजिक पायाभुत सुविधा आणि सर्वांगीण प्रदेश विकासासाठी सकारात्मक योगदान देईल.
- पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सर्व पर्यावरणीय मुद्दे जसे कि हवा, पाणी ध्वनी, माती, जमीन, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी बाबत कार्यवाही करण्यात येईल.